# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६२ ११८८

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
संकेतस्थळ :www.unipune.ac.in
इ—मेल :affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/६९९ दिनांक : 30/06/2021

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

विषयः– शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ पासून संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/विद्याशाखा/अभ्यास पाठयक्रम/संशोधन अभ्यासक्रम (एम.फिल, पीएच.डी.) इ. टप्प्या–टप्प्याने बंद करणे(Progressive Closure) अथवा विद्यार्थी संख्येत घट करण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/विद्याशाखा/अभ्यास पाठयक्रम/संशोधन अभ्यासक्रम (एम.फिल, पीएच.डी.) इ. टप्प्या–टप्प्याने बंद करणे (Progressive Closure) अथवा विद्यार्थी संख्येत घट करणे याबाबतचे प्रस्ताव **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे बंधनकारक आहे.**

सदर प्रस्ताव Online पध्दतीने भरावयाचे असून ते विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर BOD online -> College Users -> Affiliation मध्ये 'Closure' या लिंक मध्ये उपलब्ध आहेत. सदरहू लिंकवरून आवश्यक ती माहिती भरून खालील कागदपत्रे Upload करावीत.

१. संबंधित संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/विद्याशाखा/अभ्यास पाठयक्रम/संशोधन अभ्यासक्रम (एम.फिल, पीएच.डी.) बंद करणे अथवा विद्यार्थी संख्येत घट करण्यासंदर्भातील संस्थेचा मा. अध्यक्ष/सचिव यांचे सहीसह ठराव

२. संस्थेचे/महाविद्यालयाचे लेटरहेडवरील पत्र (Covering Letter)

तसेच ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून व Upload केलेल्या कागदपत्रांची प्रिंट काढून सदर प्रस्तावाची प्रत (Hard Copy) मा. अध्यक्ष/सचिव यांचे मार्फत (संस्थेच्या लेटरहेडवरील पत्रासह (Covering Letter)) दिनांक ०१ ऑगस्ट, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक विभागात सादर करावेत. **दिनांक ०१ ऑगस्ट, २०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या ऑफलाईन प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला,

30/6/2021

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव